या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार २४ जून २०२४ | अंक१९७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# माझं नाव मनोज जरांगे आहे हे लक्षात ठेवा, सरकारला पाटलांचा कडक इशारा

## मराठवाड्यातला मराठा समाज हा कुणबी आहे. हैदराबाद गॅझेट सांगतंय त्या सरकारी नोंदी आहेत

### कुणी आंदोलन केलं म्हणून नोंदी थांबवणार का ?

सरकारी नोंदी मराठवाड्यातल्या मराठ्यांच्या आहेत, ते घेणं गरजेचं आहे. सातारा संस्थानच्या नोंदी सरकारी आहेत, त्या घेणंही गरजेचं आहे, पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांना ते कामाला येईल. ब्रिटीश कालीन बॉम्बे गॅझेट हेही घेणं सरकारला गरजेचं आहे, म्हणजे तिथला सगळा प्रदेश आरक्षणाखाली येतो.

कुणी आंदोलन केलं म्हणून नोंदी थांबवणार का ? असा सवाल त्यांनी विचारला. कुणी आंदोलन केलं म्हणून सरकारी नोंदी थांबवणार असाल तर सरकारच अस्तित्वात आहे की नाही याचा विचार महाराष्ट्रातल्या, देशातल्या जनतेला करावा लागेल. मराठवाड्यातला मराठा समाज कुणबी, असं कायदा सांगतो. सरकारी नोंदी कोणाला नाकारता येत नाहीत. गावागावांमध्ये कुणबी नोंदी सापडल्या आहेत, असं जरांगे पाटील म्हणाले.

मी गोधा पट्ट्यात काम करत होतो बाहेर काम करतांना समाजाला सरकारला सांगितले.८३ क्रमांकाचा ओबीसी मराठा एक आहे.2004 ला मराठा कुणबी एक कायदा पारित करण्यात आला.आता याला जोडून सरकारच म्हणणं कुणबी 83 क्रमांकला आहे.कुणबी मराठा वेगळा आहे म्हणत असाल तर प्रमुख जाती घातल्या नंतर 1994 तेव्हा 350 जाती झाल्या. मग या जाती झाली कशी? महाजन म्हणाले मराठा कुणबी वेगळं आहे. माळी असताना माळी समाजातील पोट जाती कष्या घेतल्या? जर त्यांची पोट जात होऊ शकाते तर मराठा समाजाची कुणबी पोट जात होऊ शकत नाही का? असा सवाल जरांगे यांनी उपस्थित केला.



सरकारने सडेतोड भूमिका घेतल्याशिवाय आता पर्याय नाही. कायदा काय म्हणतोय, मराठवाड्यातला मराठा समाज हा कुणबी आहे. हैदराबाद गॅझेट सांगतंय त्या सरकारी नोंदी आहेत.त्याचा रेकॉर्ड तपासलं जात नाहीये, ते आधी तपासायला तातडीने सुरूवात करा अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्र्यांकडे केली.

गावागावासह , तालक्या-तालुक्यासह हैदराबाद संस्थानच्या या सरकारी नोंदी आहेत. या देशात आणि राज्यात कोणाच्याही सरकारी नोंदी नाहीत, तरी त्यांना आरक्षण मिळतंय. मराठ्यांना १३ तारखेच्या आत आरक्षण देणं हे बंधनकारक आहे. तुम्ही जे खोटं आहे, जे बोगस आहे ते दिलं, जे सत्य आहे ते दिलं नाही. त्यामुळे माझी तुम्हाला हात जोडून विनंती आहे, आपण खूपच स्पष्टपणे बोलणं गरजेचं आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मीडियाशी संवाद साधताना थेट सरकारलाच इशारा दिला आहे.

1994 ला दिलेलं आरक्षण रद्द करा

1994 साली दिलेलं आरक्षण तातडीने रद्द करा. हे आरक्षण दिलं कसं ते 13 तारखेच्या अगोदर सांगा.व्यवसायाच्या आधारावर आरक्षण दिलं असल तर आम्ही आमचा व्यवसाय दाखवतो. माळी समजा शेती करतो म्हणून दिलं असेल तर आम्हाला पण द्या.

मुस्लिम समाजाच्या सरकारी नोंदी निघाल्या आहे.यामुळे मुस्लिमांना देखील ओबीसी मधून आरक्षण द्या. कसं देत नाही ते बघतो.आमच्या पाठीत खंजीर खुपसून तुम्ही १६ टक्के आरक्षण दिले कसं? आम्ही भाऊ मानलं मात्र तुम्ही आमच्या ताटात औषध कालवलं आहे. लोहार कुंभार समाजाच्या देखील सरकारी नोंदी आधारे आरक्षण द्या.बाबासाहेबांनी दिलेल्या आरक्षण सोडून सगळं आरक्षण रद्द करा, वरचे 16 टक्के उडवून टाका विधानसभेत गुलाल तुमच्यावर गुलाल रुसेल

सगे सोयर आमच्या व्याख्येनुसार देत असाल तर द्या, नाही तर देऊ नका. वाशी मध्ये उधळलेला गुलालाचा अपमान करू नका. नाही तर विधानसभेत गुलाल तुमच्यावर गुलाल रुसेल असा इशाराही जरांगे यांनी दिला. मी कसा बदनाम होईल यासाठी अनेक लोक प्रयत्न करत आहेत.विरोधकांशी लढायला मी समर्थ आहे, मात्र आपलेच लोक विरोध करत आहे. तुम्ही नाही दिलं तर आम्हाला राजकारणात उतरावं लागेल.आचारसंहिता नंतर देऊ म्हणाल तर आम्ही ऐकणार नाही. ओबीसी असो अथवा मराठा प्रत्येकाला ठासून सांगायचं सरकारने शिकलं पाहिजे. सरकार मराठ्याला देताय काय? फक्त कागद वाचता अन् जाहिराती करता का ? खोटे प्रमाणपत्र समाज देतोय का? तिथला तहसीलदार लिहून भुजबळला देत आहे. याची चौकशी करा, खर काय, काय खोटं हे होऊन जाऊ द्या.

पाहिले टप्प्यात 22 आणि दुसऱ्या टप्प्यात 43 ठिकाणी चाचपणी केली आहे. तिसऱ्या टप्प्यात पाहणी करणार आहोत. 13 पर्यंत आम्ही विधानसभेचे काही बोलत नाही. परंतु आम्ही 288 विधानसभेच्या जागा लढवली नाही तरी 288 जागा पाडू असा इशाराही जरांगेंनी दिला.

### भुजबळांची शेपूट वाढत चालली आहे

यावेळी जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्यावरही कडाडून हल्ला चढवला. सरकार मनोज जरांगे लढणार आहे.तुम्ही आरक्षण घालवलं तर मी सोडणार नाही.शेपूट लांबलं म्हणायचं नाही.जे मराठ्याला आहे ते भुजबळ ला पाहजे.यामुळे भुजबळ ची शेपूट वाढत चालली आहे अशी टीका त्यांनी केली. धनंजय मुंढे म्हणाले मागेल त्याला द्यायचं म्हणत असाल तर सरसकटच राहील काय? मी म्हणालो सरसकट द्या. १० टक्के कोर्टात टिकणार नाही.बिहार मध्ये उडलं आहे.याबाबत कुणाला दोषी ठरणार.सरकारला जाऊन बोललं पाहिजे. मात्र आता म्हणता घोळ दिसतो.स्वतः घोरत होता. काल ओबीसी आंदोलनकर्ते लक्ष्मण हाके यांची छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने भेट घेतली. तेव्हा भुजबळांनी मनोज जरांगे यांच्यावर हल्ला चढवत त्यांचा माकड असा उल्लेख केला. आज मनोज जरांगे यांनी मीडियाशी संवाद साधताना भुजबळांवर कडाडून टीका केली. ‘ त्याला काय माहीत नाही लायकी आहे.ज्यांनी तुला मोठं केलं त्यांना अटक केलीय तू काय दीलाबर म्हणतो. मोठं करणाऱ्याचे उपकार ठेवले नाही. भुजबळ भाजपचे सीट पडतो. काय दीलबऱ्या आहे रे तू? पडलेलं लोकं घेऊन दोन समाजात तेढ निर्माण करत आहे, असा आरोप त्यांनी केला

# राजस्थानी मल्टीस्टेटचे फरार अध्यक्ष, सचिव, सर्व संचालक यांना तात्काळ अटक करा ठेवीदार गुणाबाई मुंडे व सुवर्णा फड यांचे आजपासून उपोषण



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

राजस्थानी मल्टी स्टेट को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी च्या गुंतवणूकदारांची फसवणूक केल्या प्रकरणी लातूर, परळी, उदगीर या ठिकाणी राजस्थानी चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संचालक व कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून अद्याप पर्यंत सर्वजण फरार आहेत. संबंधितांना तात्काळ अटक करावी या मागणी करिता परळी पोलीस स्टेशन समोर ठेवीदार गुणाबाई मुंडे व सुवर्णा फड या आजपासून बेमुद्दत उपोषण करत आहेत.

चंदूलाल बियाणी,भालचंद्र लोढा,बद्रीनारायन बाहेती,अभिषेक बियाणी,प्रल्हाद अग्रवाल,विजय लड्डा,अशोक जाजू,सतीश सारडा,प्रेमलता बाहेती,कल्पना बियाणी,नामदेव रोडे,जगदीश बियाणी,व्ही बी कुलकर्णी,तुषार गायकवाड, कांबळे मॅडम,प्रदीप मुरकुटे आणि राजेश मोदानी यांच्यावर फसवणूक केल्याप्रकरणी कलम 406, 409, 420, 120 ब, महाराष्ट्र ठेवीदार अधिनियम 1999 अंतर्गत कलम 3 असे 5 कलम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान अभिषेक बियाणी व वंदना कांबळे यांनी अटकपूर्व जमिन साठी अर्ज केला होता तो अंबाजोगाई न्यायालया कडून फेटाळण्यात आला आहे. राजस्थानी मल्टीस्टेटचे फरार अध्यक्ष, सचिव, सर्व संचालक व अधिकारी यांना तात्काळ अटक करा या मागणी करिता परळी पोलीस स्टेशन समोर ठेवीदार गुणाबाई मुंडे व सुवर्णा फड यांनी आजपासून बेमुद्दत उपोषण केले आहे. फरार आरोपिंना तात्काळ अटक करावी, सर्वांच्या विक्री केलेल्या मालमत्तेची विशेष चौकशी करून आमच्या ठेवी परत कराव्यात या मागण्या मान्य केल्या शिवाय उपोषण थांबवणार नसल्याचे उपोषण कर्त्यांकडून सांगण्यात आले आहे.

संपादकीय

## ऑलिंपिक स्पर्धा: शांतीचे प्रतीक!

(विश्व ऑलिंपिक दिन विशेष.)

दि.२३ जून १८९४ रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीची स्थापना झाली. त्या दिवसाच्या स्मरणार्थ आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस साजरा केला जातो. जगभरातील खेळाडूंना सर्वोत्कृष्ट बनण्यास प्रवृत्त करणे हा आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस साजरा करण्याचा हेतू आहे. पहिला आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस २३ जून १९४८ला साजरा करण्यात आला. ऑलिंपिकमध्ये विजय मिळवणं नाही, तर सहभाग घेणं सर्वांत महत्त्वाचं आहे, आयुष्यात जिंकणं नाही, तर लढणं सर्वांत महत्त्वाचं आहे. कसं? याविषयीचा उहापोह श्री एन. के. कुमार यांच्या या लेखातून वाचा... संपादक.

आधुनिक ऑलिंपिकचे जनक मानले जाणाऱ्या पिएर द कुबेर्तान यांच्या त्या विधानात खेळांचेच नाही, तर जगण्याचे सूत्रही सामावले आहे. कुबेर्तान यांच्या प्रयत्नांतूनच दि.२३ जून १८९४ रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती-आइओसीची स्थापना झाली होती. त्यामुळेच २३ जून हा दिवस दरवर्षी ऑलिंपिक डे म्हणून साजरा केला जातो. ऑलिंपिक ही केवळ एक क्रीडास्पर्धा नाही, तर खेळाचा प्रसार करणारी आणि त्यातून लोकांना एकत्र आणणारी एक मोठी विश्वव्यापी चळवळ आहे. ऑलिंपिक चळवळीचे हे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी वर्षातला एक दिवस ऑलिंपिक दिवस म्हणून साजरा केला जावा, असा प्रस्ताव पहिल्यांदा सन १९४७ साली मांडण्यात आला होता. अनेक आजी माजी ऑलिंपियन खेळाडूंनी या काळात लोकांना प्रेरणा दिली आहे, खेळाने लोकांच्या जगण्यात सकारात्मकता आणली आहे आणि शारिरीक तसेच मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठीही मदत केली आहे, असे विश्व ऑलिंपिक समितीने नमूद केले होते. जगाला एकत्र आणणाऱ्या सोहळ्याची ही सुरुवात होती. ऑलिंपिक समितीची स्थापना सव्वाशे वर्षांपूर्वी झाली होती, परंतु त्याचा इतिहास बराच जुना आहे. प्राचीन ग्रीसमध्ये इसवीसनपूर्व आठव्या शतकात म्हणजे सुमारे दोन हजार सातशे वर्षांपूर्वी या क्रीडास्पर्धांची सुरुवात झाली होती. सुमारे पन्नास हजार जण त्या खेळांसाठी हजेरी लावायचे, असे उल्लेख इतिहासात आहेत. ग्रीक संस्कृतीत खेळांना व खेळाच्या स्पर्धांना महत्त्वाचे स्थान होते आणि दर चार वर्षांनी होणारा ऑलिंपिक हा सर्वात मोठा सोहळा होता, अगदी आजच्यासारखाच! परंतु ग्रीकांसाठी हाच एक धार्मिक उत्सवही होता. ग्रीक संस्कृतीत झ्यूस हा देवांचा राजा मानला जायचा. त्याच्या सन्मानार्थ ऑलिम्पिया येथे या खेळांचे आयोजन केले जायचे. येथेच झ्यूसचे मंदिर होते आणि त्यात त्याची सोने आणि हस्तिदंताने मढवलेली मूर्ती होती. तेथे धार्मिक विधीही होत असत, प्राण्यांचा बळी देण्याचीही प्रथा होती. काहीसे आपल्याकडच्या यात्रांमधल्या कुस्ती, कबड्डीच्या स्पर्धांसारखेच म्हणा ना! फरक इतकाच की त्या काळी विजेत्यांना पदक किंवा पैसे नाही, तर ऑलिव्हच्या फांदीपासून तयार केलेला मुकुट दिला जायचा आणि ते त्यांच्या गावी परतल्यावर मोठा मानसन्मान मिळायचा. खेळाडू आपल्या नगरराज्याची शान राखण्यासाठी खेळायला उतरायचे.

जागतिक ऑलिंपिक समितीतील झेकोस्लोवाकियाचे प्रतिनिधी डॉक्टर ग्रुस यांनी मांडलेली ही संकल्पना सर्वांनीच पुढे उचलून धरली आणि काही महिन्यांनी तिला मूर्त रूपही मिळाले.

# सर्वधर्मसमभाव शिकविणारी: एकमेव पंढरपूर वारी!

## (पंढरपूर आषाढी वारी विशेष.)

आषाढी एकादशीसाठी पंढरपूर येथे जाणारी वारकरी पदयात्रा होय. वारकरी भक्तांनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरपर्यंत केलेली पदयात्रा होय. वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूर येथील विठ्ठलाच्या वारीला जाणाऱ्या लोकांचा संप्रदाय होय. या संप्रदायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आषाढी वारी. या वारीमध्ये अनेक जाति-धर्माचे लोक मराठा, सोनार, कुंभार, चांभार, माळी, महार, कुणबी, न्हावी, तेली, धोबी, लिंगायत व इतर जातींचे भाविक भक्त सुद्धा जास्तीत जास्त संख्येने सहभागी होतात. वारी हा एक आनंद सोहळा असतो. तो सोहळा पंढरपूरकडे विविध संतांच्या पालख्या प्रस्थानापासून सुरू होत असतो. भक्तिवर्धक प्रेरणादायक लेख संत चरणरज: श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी वाचकांच्या सेवेत सविनय सादर केलाय... संपादक.

वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी सामुदायिक एक पदयात्रा होय. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळी होते. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका आणि देहू येथून संत तुकाराम महाराजांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत. वारकरी संप्रदायात लहान मोठा हा भेद नाही. संतोक्ती साक्ष देते-

“पंढरीच्या लोका नाही अभिमान!
पाया पडती एकमेका होऊनी लहान!!”

वारी करणाऱ्या व्यक्तीस वारकरी म्हणतात. भगवान विष्णूंचा अवतार असलेल्या पांडुरंगाचे-विठ्ठलाचे हे भक्त असतात. आपले कर्तव्यकर्म निष्ठेने करीत असता ते भगवंताचे विस्मरण होऊ देऊ नये यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालतात. या माळेच्या जपमाळ म्हणून उपयोगाशिवाय, ती गळ्यात घातल्याविना वारकरी होता येत नाही, असे वारकरी पंथ सांगतो.

स्नान करून भाळी गोपीचंदनाचा टिळा लावावा. नित्यनेमाने हरिपाठ म्हणावा. संतांचे ग्रंथ वाचावेत. देवाच्या मूर्तीचे दर्शन घ्यावे. भजन-कीर्तनात सहभाग घ्यावा. पंढरपूरवारी करावी तसेच एकादशीव्रत करावे. वारकऱ्याने पंढरपूरमध्ये सात्त्विक आहार व सत्त्वाचरण करावे. परोपकार आणि परमार्थही करावा. जीवनातील बंधनातून, मोहातून हळूहळू बाजूस होऊन पांडुरंगाशी एकरूप व्हावे, नामस्मरण करावे, असा साधा आणि उघड परमार्थ वारकरी संप्रदायाने सांगितला आहे. नामजपाने पुण्य मिळते हा भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय. जो नियमित वारी करतो तो वारकरी असतो. वारकरी जो धर्म पाळतात त्याला वारकरी धर्म असे म्हणतात. वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हटले जाते-

“पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान!
आणिक दर्शन विठोबाचे!!”

या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी महिलापुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे, असे मानले जाते.

वारकरी महावाक्य- वारकरी धर्मात कोणत्याही कार्याची सुरुवात करताना- “पुंडलिक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जयऽऽऽ!” असा जयघोष केला जातो. स्थानपरत्वे या जयघोषात पंढरीनाथ भगवान की जय, असाही भेद आढळतो. अनेक ठिकाणी माउली ज्ञानेश्वर महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय, शान्तिब्रह्म एकनाथ महाराज की जय अशीही विविधता आढळते. या जयघोषाला वारकरी महावाक्य किंवा वारकरी महाघोष म्हटले जाते. पायी केल्या जाणाऱ्या पंढरीच्या वारीची परंपरा बरीच जुनी आहे. तेराव्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातींच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करून घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत पुढे संत एकनाथ महाराज, जगद्गुरू संत तुकाराम महाराज, संत मल्लप्पा वासकर यांसारख्या संतांनी वारीची परंपरा चालवली. संत तुकाराम महाराज यांच्याही कुटुंबात वारीची परंपरा होती. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे म्हणतात- “पंढरपूरची वारी हा वारकरी संप्रदायाचा मुख्य आचारधर्म होय. वारी ही ज्ञानदेव पूर्वकालीन प्रथा आहे, किंबहुना वारकरी हे नावच वारीमुळे पडले आहे. वारीतून या संप्रदायाची सामाजिकता आणि समाजाभिमुखता स्पष्ट होते. वारीची परंपरा सर्व संतांनी जतन केली आहे.” ज्ञानदेवांच्या कर्तृत्वामुळे हा संप्रदाय जनमानसावर प्रभाव गाजवून महाराष्ट्रव्यापी झाला; परंतु संप्रदायाचा आद्य प्रवर्तक ठरतो भक्त पुंडलिकच! भक्त पुंडलिकापासून या संप्रदायाला इतिहासाला सुरुवात होते. या इतिहासाचे पुढील कालखंडांत विभाजन असे करता येईल- ज्ञानदेवपूर्व काळ- भक्त पुंडलिकाचा काळ, ज्ञानदेव-नामदेव काळ, भानुदास-एकनाथांचा काळ, तुकोबा-निळोबांचा काळ, तुकारामोत्तर तीनशे वर्षांचा काळ. म्हणून वारकरी पंढरीमहिमा गात गात जातात-

“जाता पंढरीशी सुख वाटे जीवा।
आनंदे केशवा भेटताचि।।
या सुखाची उपमा नाही त्रिभुवनी।
पाहिली शोधोनि अवघी तीर्थे।।
सेना म्हणे खुण सांडी सांडी संती।
यापरती विश्रांती न मिळे जीवा।।
विठ्ठल विठ्ठल विठ्ठला,
हरि ओम विठलाऽऽऽ...।।”

वारीच्या परंपरेची माहिती मुलांना विशेषतः पुढील पिढ्यांना होण्यासाठी बालगटाच्या शाळा ते माध्यमिक शाळा यांमध्ये आषाढी एकादशीच्या आधी वारीचे आयोजन केले जाते. विद्यार्थी-विद्यार्थिनी वारकरी पोशाख घालून येतात आणि पालखी सजवून त्यात विठ्ठल-रखुमाई यांची पूजा करून पालखी सोहळा साजरा करतात. शहरातील निवडक माध्यमिक शाळांतील मुले प्रत्यक्ष वारीमध्ये सहभागी होतात आणि वारकरी भक्तांशी संवाद साधतात, ठरावीक अंतर पायी चालून वारीचा अनुभव घेतात. सायकल वारी- वारीतील विविध सुविधांची पाहणी करण्यासाठी २००० युवक सायकल वारी करतील अशी योजना २०१७ साली करण्यात आली. वारीतील गर्दीमुळे होणारी अस्वच्छता दूर करण्यासाठी वारीनंतर पंढरपुरात तसेच वारीमार्गावर स्वच्छता अभियान राबविले जाते.

पंढरपूरला जात असलेल्या वारकरी समुदायाची सेवा करण्याची संधी समाजाच्या विविध स्तरातून घेतली जाते. काही मंडळी वैयक्तिक किंवा कौटुंबिक स्तरावर अशी सेवा पुरवितात. ज्यामध्ये वारीच्या मार्गावर उभे राहून वारकऱ्यांना खाद्यपदार्थ पुरविणे, पाण्याची व्यवस्था, कपडे, वर्षावस्त्र देणे, अशी सेवा केली जाते. सामाजिक संस्था, औद्योगिक संस्था या सुद्धा त्यांना विविध सुविधा पुरवितात. यामध्ये त्यांची सेवा करणे एवढाच भाव नाही तर त्यांच्या रुपातील विठ्ठल परब्रह्माला पुजणे, असा भाव असतो. काही वैद्यकीय संस्था आणि रुग्णालये वारकरी भक्तांची शारीरिक चाचणी, आरोग्य व उपचार यांची काळजी घेतात. वारीसाठी भक्तांना वाहनांची सुविधा देण्यात येते. यासाठी शासकीय स्तरावर योजना राबविल्या जातात. पालकी मार्गाची पाहणी करणे, रस्त्यांची स्वछता, वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी यांची व्यवस्था महाराष्ट्र शासनातर्फे केली जाते. चला, आपणही सुरात सूर मिसळत गाऊ-

“विठ्ठल विठ्ठल विठ्ठला,
विठ्ठल विठ्ठल विठ्ठलाऽऽऽ...।
का गा ना येशी विठ्ठला।
ऐसा कोण दोष मला।।
दीनानाथ दीनबंधू।
जनी म्हणे कृपासिंधू।।”

वारी सगळ्यांनाच माहीत आहे. मात्र परतवारी माहीत असणारे आणि ती करणारे लोक खूप कमी आहेत. वारी करताना जागोजागी पावलापावलांवर दानशूर लोक सोयी सुविधा उपलब्ध करून देतात. मात्र परतवारीच्या वेळी अतिशय कष्टप्रद प्रवास करावा लागतो. वारीला ग्लॅमर आहे, तर परतवारीला लाट ओसरून गेल्यानंतरचं उदासवाणे वातावरण बघावयास मिळते. परतवारीलाही वरीलप्रमाणे सर्व सोयी सुविधा व आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात अशी याद्वारे एक रास्त व माफक अपेक्षा! !! पंढरपूर आषाढ वारी व जत्रेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संत चरणरज:**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**(भारतीय संत-महापुरुषांच्या जीवनचरित्रांचे गाढे अभ्यासक.)**
**मु.वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी चौक-रामनगर, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

# नाशिकमधील काळाराम मंदिर प्रकरणात पत्र काढणाऱ्यास अटक, आरोपीकडून चार मोबाईल, दोन लॅपटॉप जप्त केले आहे



**नाशिक/प्रतिनिधी**

नाशिकमधील काळाराम मंदिराच्या परिसरात आक्षेपार्ह पत्रके वाटण्यात आले होते. या पत्रकारावर काळाराम मंदिर आसपास असणाऱ्या विशिष्ट समाजातील लोकांना मंदिरात प्रवेश वर्ज्य असल्याचे म्हटले होते. त्यावरून राज्यात मोठा गदारोळ निर्माण झाला होता. नाशिकमध्ये शनिवारी (२२ जून) पंचवटी परिसरात चार तास तणावाचे वातावरण होते. या प्रकरणात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले आहे. हे पत्र प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. दुसऱ्या व्यक्तीशी असलेल्या वैमनस्यातून हा प्रकार केला गेल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. काय म्हणाले देवेंद्र फडणवीसमाध्यमांशी नाशिकमधील प्रकाराबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, त्या पत्रासंदर्भात सर्व माहिती पोलिसांनी काढलेली आहे. काळाराम मंदिराच्या आसपास राहणाऱ्या लोकांना धमकी देणारे पत्र काढण्यात आले होते. ते पत्र पब्लिश प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीला अटक करण्यात आलेली आहे. दुसऱ्या व्यक्तीशी असलेल्या वैमनस्यातून हे पत्र काढले गेले आहे. हे पत्र काढणारा व्यक्ती अनुसूचित जातीचाच आहे. त्यामागे काय कारण आहे, हे शोधले जात आहे. आरोपीकडून चार मोबाईल, दोन लॅपटॉप जप्तआरोपीकडून चार मोबाईल, दोन लॅपटॉप जप्त केले आहे. त्या व्यक्तीच्या पाठिशी कोण आहेत? दंगल घडवण्यासाठी त्याने हे पत्र काढले आहे का? ज्याच्या नावाने पत्र काढले, त्याच्याशी त्याचे काय वैर होते. त्या व्यक्तीला बदनाम करण्यासाठी त्याने पत्र काढले आहे का? या सर्व प्रश्नांची चौकशी नाशिक पोलीस करत आहे. हे पत्र काढून पत्र सोशल मीडियावर टाकायचे आणि लोकांमध्ये गैरसमजुती निर्माण करून दंगा घडवण्याचे प्रयत्न यापुढेही होऊ शकतात. त्याकडे पूर्ण लक्ष ठेवून आम्ही आहोत. राजकीय नेत्यांचे टोचले कान काही राजकीय नेत्यांनी हे पत्र ट्विट केले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेत्याकडून हा प्रकार झाला. त्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, या प्रकारात शहानिशा न करता वस्तुस्थिती न तपासता तसे पत्र व्हायरल केल्यास समाजात तेढ निर्माण होईल. यामुळे राजकीय नेत्यांनी आपली सामाजिक जबाबदारी ओळखली पाहिजे,

## अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेने सिद्धेश्वर मंदिर कव्हे या ठिकाणी प्रवचन सोहळा संपन्न...

**सोलापूर/प्रतिनिधी**

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने व प. पू. कानिफनाथ महाराज यांच्या प्रेरणेने नाम गजर व प्रवचन सोहळा रविवार दि २३/०६/२०२४ रोजी सिद्धेश्वर मंदिर कव्हे ता. माढा येथे आयोजित केला होता. या कार्यक्रमामध्ये गुरू पूजन:-११. ०० ते ११. ३०वा झाला नाम गजर:-११. ३० ते २. ३० वा झाला प्रवचन सेवा १.०० ते २. ३० वा ज.न.म. प्रवचनकार सौ.



शोभा ताई दत्तात्रय बेलदार) यांचे शुश्राव्य असे प्रवचन झाले.अखिल भारतीय हिंदू संग्राम सेना जिल्हा सोलापूर एक दिवस मैत्रीचा कार्यक्रम घेण्यात आला त्यानंतर सांगता आरती झाली. तदनंतर महाप्रसाद घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व गुरुबंधू-गुरुभगिनी यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद द्विगुणीत केला.हे आयोजन माढा तालुका सेवा समिती व कव्हे येथील गुरुबंधू-गुरुभगिनी यांनी केले होते.

## जेष्ठ गायक व संगीतकार धयाळकर यांना पुरस्कार प्रदान !




व

नुकताच मुंबईत प्रा सुरेंद्र गावस्कर सभागृहात दादर येथे “कोकण दीप २२वा वर्धापन” दिनानिमित्त जेष्ठ गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर यांना संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बद्दल प्रसिद्ध सिने- नाट्य अभिनेत्री सौ साक्षी नाईक यांच्या हस्ते सन्मानपत्र स्मृतिचिन्ह देऊन ‘मुंबई रत्न’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# प्रशांत पाटील यांच्या निधनाने पक्षाची मोठी हानी-शरद पवार



**उरण/प्रतिनिधी** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील हे राष्ट्रवादि काँग्रेस पार्टीचे प्रामाणिक व एकनिष्ठ कार्यकर्ते होते. पक्षाला तळागाळात पोहोचविण्याचे काम प्रशांत पाटील यांनी केले असून पक्षासाठी रात्रंदिवस झटणारा कार्यकता पक्षातून गेला त्यामुळे पक्षाला मोठा धक्का बसला आहे. प्रशांत पाटील सारखा सच्चा कार्यकर्त्याच्या निधनामुळे पक्षाची खूप मोठी हानी झाली आहे. असे भावनिक उद्गार राष्ट्रवादि काँग्रेस पार्टीचे संस्थापक तथा,नेते शरदचंद्र पवार यांनी उरण येथे केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आक्रमक व धडाकेबाज नेतृत्व असलेले उरणचे सुपुत्र प्रशांत भाऊ पाटील यांचे २० जून २०२४ रोजी आकस्मिक निधन झाले. त्या अनुषंगाने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक तथा माजी कृषी मंत्री शरदचंद्र पवार व त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार यांनी उरण शहरातील कामठा येथील प्रशांत भाउ पाटील यांच्या निवास जाउन प्रशांत पाटील यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.या प्रसंगी शरद पवार यांनी आपल्या भावना व्यक्त करून प्रशांत पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.यावेळी शरद पवार भावूक झाले होते. प्रशांत पाटील यांनी पक्षासाठी दिलेले योगदान कधीच विसरता येणार नाही. पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात ते पुढे असायचे.त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो. हे दु:ख पचविण्याची परमेश्वर त्यांच्या कुटुंबियांना ताकद देवो या शब्दात शरद पवार यांनी श्रध्दांजली अर्पण केली. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस संतोष घरत,माजी आमदार मनोहरशेठ भोईर, जेएनपीटीचे विश्वस्त दिनेश पाटील , शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस विकास नाईक,राष्ट्रवादीचे उरण विधानसभा अध्यक्ष - गणेश नलावडे,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष मनोज भगत,शहराध्यक्ष मंगेश कांबळे, युवक कार्याध्यक्ष समाधान म्हात्रे,युवक अध्यक्ष सचिन पाटील,सामाजिक कार्यकर्ते समीर सुर्वे यांच्यासह प्रशांत पाटील यांच्या पत्नी,मूले, नातेवाईक,मित्र परिवार तसेच सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.यावेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# विद्यार्थ्यांकडे ज्ञानाचा भांडार असला की ते साता समुद्रा पार जाऊ शकतात-ह.भ.प संजय जमादार

## शहादा येथे गुणवंतांचा मराठा समाज युवा पर्वतर्फे सन्मान

**नंदुरबार/प्रतिनिधी** मोड येथे मराठा समाज युवा पर्वतर्फे घेण्यात आलेल्या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याप्रसंगी ह.भ.प संजय जमादार म्हणाले की, प्रत्येक व्यक्ती हा वाचनाने व परिश्रमामुळेच मोठा होतो विद्यार्थ्यांकडे ज्ञानाचा भांडार असला की ते साता समुद्रापार जाऊ शकता असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. याप्रसंगी नंदुरबार जिल्हाभरातील शेकडो विद्यार्थी- विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व सरस्वती मातेचे प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. शहादा तालुका मराठा युवा पर्वच्या वतीने दहावी-बारावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात मोठ्या पदांवर व देशाबाहेर गेलेल्या व्यक्तींचा आणि त्यांच्या आई-वडिलांचा तसेच समाजासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार शहरातील अन्नपूर्णा लॉन्समध्ये दि. 23 जून रोजी उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी जिजामाता शिक्षण संस्थेचे सचिव आता राष्ट्रवादीचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजित मोरे तर प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक संतोष साळुंखे, हभप संजय जमादार, उद्योजक आनंदराव चौथे, राजेश जाधव, प्रा.ज्ञानेश्वर सोनवणे, पांडुरंग गोरे, प्रा.संभाजीराव काळे,शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक भुवनेश मराठे, संजय गायकवाड, युवराज जाधव, शांतीलाल गायकवाड, नवनीत शिंदे, माजी नगराध्यक्ष रवींद्र पवार, डॉ.शिरीष परांडे, हरीश हराळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रस्तावना चंद्रकांत बोराणे केली. याप्रसंगी जिजामाता शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.अभिजीत मोरे, प्रा. ज्ञानेश्वर सोनवणे, ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण कदम, राजेश जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा




दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश तट्टे यांनी केले तर आभार सागर मराठे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठा युवा पर्वच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले सदर कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी जिल्हाभरातील विविध क्षेत्रातील मान्यवर पालक आदी उपस्थित होते.

# शासनाकडे दुसरं काम नव्हतं का?; लक्ष्मण हाके यांचं विधान नेमकं काय?

कुणबी या नोंदी असतील. तर त्यांना कोणी रोखू शकत नाही. कारण मंडल आयोगात कुणबी बाय डिफॉल्ट आहेत. कुणबी दाखले रद्द करता येत नाही. पण मराठा लिहिलं त्या पुढे कु लावायचं. कुणबी हा प्रवर्ग वेगळा आहे. खानदेश कुणबी गिर्णा नदीच्या काठावर राहतात, खऱ्या कुणबी यांचं राहणीमान वेगळ आहे. मनोज जरांगे यांना मंडल आयोग कधी



निर्माण झाला काही माहिती नाही. घटनात्मक अधिकार असलेल्या आयोगाला बोलणं म्हणजे पारावरच्या गप्पा आहेत, असं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. जर हिंदू कासार ओबीसीतून आरक्षण घेऊ शकतो. तर मुस्लिम कासार पण त्या ठिकाणी जाऊन चौकशी करू शकतो. शासनाकडे दुसरं काम होत का नव्हतं?, हे न्यायचे तत्त्व नाही हे मध्येच घुसवण्याचं तत्त्व आहे. ते हाताने कुणबी लिहिताय. वसंतराव नाईक महामंडळाला निधी मिळत नाही, महाज्योती ला निधी मिळत नाही. आरक्षण एकमेव उपाय नाही. ओबीसीतून आमच्या सारखी माणसं जर पुढे आली तर ही शासनाची माणसं आहेत. मॅनेज आहेत, असं लक्ष्मण हाके म्हणाले.

## बॉलीवूड अभिनेत्री चित्रा दीक्षित व अभिनेता रविशा तेलधुणे खाकी... लय भारी मध्ये...आमने-सामने

कवि सरकार इंगळीशेवगाव पांडुरंग गोरे - दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांचा आगामी मराठी चित्रपट खाकी... लय भारी देशाच्या दुश्मनासाठी लय.. डेंजर आहे , या मराठी चित्रपट मध्ये मुख्य भूमिकेत पुण्याचे सिने अभिनेता रविशा तेलधुणे यांनी विविध भरपूर चित्रपटांमध्ये भूमिकां केलंय आहे, प्रथमचं ते बॉलीवूड सिने अभिनेत्री चित्रा दीक्षित, यांच्यासमोर फिल्म स्क्रीन पडदा शेअर करतानी आमने-सामने दिसणार आहे ,याची उत्सुकता आता प्रेक्षकांना लागली आहे , या चित्रपटांमध्ये पोलीस वाल्या ,सायकल वाल्या, ब्रेक लावून थांब ...या धर्तीवर, प्रेरित होऊन दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांनी पुढिल गाणे ची रचना केली आहे, ... टांगमोडे हवालदार आला... तुझ्या जीवाचां मैतर झाला... हे गाणे, धमाल साँग चित्रीत होणार आहे , खाकी.. लय भारी यामध्ये रवीशा तेलधुणे यांची हटकेबाज, कॉमेडी पोलीस कॉन्स्टेब बजरंग टांगमोडे हवालदाराची जबरदस्त भूमिका आहे, अभिनेता रविशा तेलधुणे यांची या भूमिकेसाठी पूर्वतयारी झाली असून बॉलिवूड सिने अभिनेत्री चित्रा दीक्षित समोर भूमिका परफॉर्मन्स करण्याची त्यांच्या मनात सध्या चल बिचल चालू आहे, हा चित्रपट 15 ऑगस्ट पासून चित्रीकरण करण्यास प्रारंभ होणार आहे,

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
सोमवार २४ जून २०२४
पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# बीड मध्ये परत लाखोंच्या संख्येने मराठे एकवटणार !

-11 जुलै ला मध्ये मनोज जरांगे यांच्या उपस्थितीत शांतता रॅली -शहरात पार पडलेल्या नियोजन बैठकीला जिल्ह्यातील बांधवांची उपस्थिती -छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथे रॅलीचा समारोप जाहिर सभेने होणार

बीड : मराठा समाजाच्या मागण्या सरकार दरबारी प्रलंबित असून मनोज जरांगे यांनी सुरु केलेला लढा अजून सुद्धा सुरुच आहे. सरकारला 13 जुलै पर्यंत वेळ दिल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाड्यात शांतता रॅल्यांचे आयोजन केले आहे. बीड शहरात 11 जुलैला भव्य दिव्य शांतता रॅली काढण्यात येणार आहे. याच अनुषंगाने आज (ता. 23) शहरातील सुर्या लॉन्स येथे नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला जिल्ह्यातील मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही रॅली विश्वरत्न डा. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी असणार आहे. या रॅलीचा समारोप मनोज जरांगे पाटील यांच्या जाहिर सभेने छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथे होणार आहे. लोकसभा निवडणूकीनंतर मराठवाड्यातील वातावरण दुषित बनले आहे. निवडणूका संपल्या तरी येथील तणाव आहे तशाच असल्याचे दिसत आहे. त्यात मराठा समाजाच्या मुख्य मागण्या सरकार दरबारी प्रलंबित आहेत. याच अनुषंगाने मनोज जरांगे पाटील यांनी सुरु केलेला लढा अजून सुद्धा सुरुच आहे. मराठवाड्यात मनोज जरांगे पाटील यांनी आठही जिल्ह्यात



शांतता रॅलीचे आयोजन केले आहे. बीड मध्ये 11 जुलैला भव्य दिव्य अशी शांतता रॅली काढण्यात येणार आहे. ही रॅली डॉ. बाबासाहेब चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी असणार आहे. या रॅलीत जिल्ह्यातील लाखो मराठा बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथे रॅलीचा समारोप मनोज जरांगे पाटील यांच्या जाहिर सभेने होणार आहे. याच अनुषंगाने आज बीड मध्ये नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला जिल्हाभरातून मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. मुक मोर्चा नंतर लाखोच्या संख्येने मराठे परत येणार एकत्र 2016 मध्ये ज्या प्रकारे राज्यभरात मुक मोर्चे काढण्यात आले होते. याची दखल संपुर्ण जगाने घेतली होती. या मुक मोर्चाची सुरुवात बीड मधून झाली होती. नंतर संपुर्ण राज्यभरात मुक मोर्चे काढण्यात आले. त्यानंतर परत जिल्ह्यातील मराठे लाखोच्या संख्येने एकत्र येणार आहे. यामध्ये मराठा समाजातील महिला, वयोवृद्ध नागरिक, मुले, युवक संपुर्ण घरदारच या शांतता रॅलीत सहभागी होणार आहे. मुक मोर्चा ज्या प्रकारे शांतते पार पडला, त्याच प्रकारे शांतता रॅली सुद्धा शांततेत पार पाडण्यासाठी आयोजक तयारीला लागले आहेत. मनोज जरांगे पाटीलघेणार रॅलीत सहभागमराठा आरक्षणासाठी ज्यांनी राज्यभरातील मराठा समाज एकत्र केला असे मनोज जरांगे पाटील हे बीड मध्ये होत असलेल्या शांतता रॅलीत सहभागी होणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी ओपन व्हॅन ठेवण्यात येणार आहे. या व्हॅन मध्ये फक्त मनोज जरांगे पाटील असणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांचे भव्य दिव्य असे स्वागत बीड शहरात करण्यात येणार आहे. या सर्व बाबींच्या अनुषंगाने मराठा समाजाच्या वतिने चोक नियोजन करण्यात येत आहे.

## वैद्यनाथ आय टी आय हाळम मध्ये प्रवेश सुरु

### आयटी आय रजिस्ट्रेशन करण्यासाठी राहिला शेवटचा सप्ताह

**परळी (प्रतिनिधी)** दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान हाळम संचलित श्री वैद्यनाथ आय टी आय कॉलेज हाळम ( डी जी ई टी नवी दिल्ली द्वारा मान्यताप्राप्त) असून हे कॉलेज हाळम ता परळी वैजनाथ जिल्हा बीड) येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीत प्रवेश प्रक्रिया सुरू असुन एस एस सी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी विद्यार्थिनी यांना आता ईतरत्र जाण्यासाठी आवश्यकता नाही आता आपल्या तालुक्यातील हाळम येथील दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान हाळम चे संस्थापक अध्यक्ष माधव मुंडे यांनी आय टी आय च्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

परळी- धर्मापुरी रोड बसस्टॉप जवळ हाळम ता परळी वैजनाथ जिल्हा बीड येथे मराठवाड्यात फक्त हाळम येथे असलेला एकमेव ट्रेड १)सोलार टेक्निशियन (१ वर्ष) नोकरीसंधी एम एस ई बी व अन्य विभागामध्ये मोठ्या प्रमाणात नोकरीची संधी , सोलार विज निर्मिती क्षेत्रात,रेल्वे, एअरलाईन, आदिवासी विभाग इत्यादी ठिकाणी १०० टक्के नोकरीची संधी.२) हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर (आरोग्य निरीक्षक) कालावधी १ वर्ष नोकरीची संधी- आरोग्य निरीक्षक MPW डॉक्टर ,एअरलाईन , केंन्द्र व राज्य सरकारचे स्वास्थ्य विभाग , जिल्हा परिषद, महानगर पालिका, पर्यावरण विभाग, रेल्वे विभाग, इत्यादी ठिकाणी १०० टक्के नोकरीची संधी. ३) इलेक्ट्रीशियन (विजतंत्री) कालावधी २ वर्ष नोकरीसंधी महावितरण,महापारेषण, महाजनको, महिंद्रा,टाटा,बजाज विमानाचा कारखाना ,DRDO माझगाव डाक , आदी ठिकाणी नोकरीची १०० टक्के शासकीय नोकरी संधी. ४) वायरमन( तारतंत्री) कालावधी २ वर्ष नोकरीसंधी - महावितरण, महापारेषण , इंडीयन नेव्ही, औष्णिक वीज निर्मिती केंद्र , महिंद्रा, टाटा, बजाज,होंडा ल्युमिनस, आदी ठिकाणी नोकरीची १०० टक्के शासकीय नोकरी संधी आजच आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करा. संस्थेची वैशिष्ट्य दर्जेदार प्रशिक्षण,व अनुभवी निर्देशक , संपुर्ण यंत्रसामग्री सुसज्ज व आधुनिक वर्कशॉप,आय टी आय उत्तीर्ण विद्यार्थीना उच्चशिक्षणाची संधी . उत्कृष्ट निकालाची तसेच अप्रेंटिस ची हमी .संस्थेची वैशिष्ट्य म्हणजे प्रशस्त कॉम्प्युटर लॅब,प्रात्यक्षिकावर विशेष भर. सुसज्जव भव्य इमारत आणि ग्रंथालय सुविधा . सुपरफास्ट इंटरनेटची सुविधा औद्योगिक सहलीचे नियोजन. शंभर टक्के प्लेंसमेंटची हमी देण्यात येते ग्रामीण भागातील विधर्थ्यांना आता दूर कोठेही जाण्याची आवश्यकता नसल्याच मत संस्थेचे अध्यक्ष माधव मुंडे यांनी व्यक्त केले. त्याच्या मार्गदर्शनाखाली वैद्यनाथ आय टी आय चे प्राचार्य व स्टाफ यांनी दिली आहे.



भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना अलोक द्वीवेदी जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके अमर साळवे रामराजे यादव सह अखिल शेख

## वसंत महोत्सवात होणार गोरबंजारा उधोजकांचा सत्कार आणि सन्मान - उधोजक रामशेठ राठोड

माजलगाव : हरित क्रांतीचे प्रणेते, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्या जन्ममहोत्सवा निमित्त वसंत महोत्सवाचे राज्यभरात आयोजन करण्यात आले आहे .१ जुलै ते ३१ जुलै दरम्यान होणाऱ्या या वसंत महोत्सवाचा शुभारंभ १ जुलै रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव (बीड, मराठवाडा) येथे आयोजित करण्यात आला आहे. या वेळी वृक्षारोपण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार व पुरस्कार अशा कार्यक्रमांचे आयोजन तसेच वसंत व्याख्यान मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे तसेच यावेळी गोरबंजारा समाजातील उद्योजकांचही सत्कार सन्मान होणार असल्याचे मुंबई येथील उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते रामशेठ राठोड यांनी कळवले आहे. गोरबंजारा सांस्कृतिक प्रदर्शन रॅली, नाशिक ढोल-ताशा, डपडा , महिला नृत्य, घोडा, हत्ती रथ, भजनी मंडळ, असंख्य समाजबांधव, धर्मगुरू यांसोबत महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्या प्रतिमा रॅलीचे यावेळी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी गोरधर्म पिठाधीश्वर बाबूसिंग महाराज, गोरधर्म पिठाचे धर्मगुरू महंत जितेंद्र महाराज, धर्मगुरू कबीरदास महाराज, धर्मपीठ प्रवक्ता साहेबराव शात्री महाराज, अनिल महाराज, यांचे सह अनेक यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे भगवंत सेवक किसनभाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे भव्य आयोजन राष्ट्रीय बंजारा सेवा संघ तर्फे उद्योजक तथा युवा नेते राजेशभैय्या राठोड व उद्योजक रामशेठ राठोड यांनी केले आहे उद्योगपती राजेशभैय्या राठोड यांचा याच दिवशी वाढदिवस असून भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भव्य रॅलीचे आयोजन केले असून त्यात वेशभूषा परंपरागत थाळी नंगारा नृत्यासह बंजारा महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम पाहायला मिळतील ढोल ताशा घोडे, हत्ती व बैलगाडीतून बंजारा समाजाच्या लदेणीची वैभवशाली परंपरा व संस्कृतीचे दर्शन बघायला मिळणार आहे वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे भव्य रॅली मार्ग छत्रपती संभाजी महाराज चौक ते वसंतराव चौक (माजलगाव) असा असणार आहे. रॅलीच्या वेळी शहरात भव्य आतिषबाजी



करण्यात येणार आहे तसेच छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे गोरविचार पीठावरुन बसंतराव नाईक यांच्या जीवनकार्याचा गौरव केला जाणार आहे. महानायक वसंतराव नाईक यांच्या जीवनावर व्याख्यान माला आयोजित केली असून वक्त्यांनी आपली नावे कळवावी असे आवाहन राष्ट्रीय गोरबंजारा सेवा संघातर्फे करण्यात आले आहे वसंतराव नाईक यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचावे व महानायक वसंतराव नाईक यांच्या विचारांवर समाजाची राजकीय इच्छाशक्ती प्रबळ व्हावी अशी इच्छा आयोजक राजेश राठोड यांनी व्यक्त केली तेरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेल्या महानायक वसंतराव नाईक यांच्या कार्यापासून प्रेरणा घेत गोरबंजारा समाजाने आता राजकीय क्षेत्रात उतरले पाहिजे व मोठ्या प्रमाणात जिल्हापरिषद पंचायतसमिती ते विधानसभेपर्यंत बंजारा समाजाचा आवाज घुमला पाहिजे असे मत भगवंतसेवक किसनराव राठोड यांनी व्यक्त केलेया कार्यक्रमांसाठी संपूर्ण राज्यातील प्रमुख लोकांची उपस्थिती असणार आहे यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपली नावे कळवावी व्याख्यान मालेमध्ये भाग घेणाऱ्या वक्त्यांनी आपली नावे कळवावी आणि विविध उपक्रमांसाठी समाजबांधवांनी आपली नावे कळवावीत असे आवाहन सुद्धा रामशेठ राठोड यांनी केले १ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचा शुभारंभ होईल ११ ते १ वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न होईल १ वाजता नाईक साहेबांच्या प्रतिमेचे पूजन धर्मगुरूंच्या हस्ते सन्मान पुरस्कार व स्नेहभोजन असे आयोजन असेल , दुपार पासून व्याख्यान माला सुरू होईल. सायंकाळी ५ वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली जाईल. सायंकाळी ७ वाजता राज्यभर जयंतीमहोत्सव साजरे करण्यासाठी, वसंतराव नाईक यांच्या कार्याचा प्रकाश दूरवर पसरण्यासाठी भव्य आतिषचाजीचे आयोजन करण्यात आले आहे साधारणतः सायंकाळी ७ वाजता भव्य आतिषबाजी करून कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे युबा उद्योजक राजेशभैय्या राठोड यांचा वाढदिवस येथे केक कापून साजरा केला जाणार आहे या कार्यक्रमाचा उत्साह संपूर्ण मराठवाड्यातून दिसून येत आहे या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय बंजारा सेवा समितीचे पदाधिकारी तथा आयोजक राजेश राठोड व उद्योजक रामशेठ राठोड यांनी यावेळी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com